**शिक्षण विभाग (प्रा.), जिल्हा परिषद परभणी.**
प्रशासकीय इमारत,प्रियदर्शनी इंदिरा गांधी क्रीडा संकुल जवळ परभणी
E-mail - mdmparbhani@gmail.com
जा.क्र.जिप/शिवि/आस्था-3/कावि/6037/24 दिनांक :- 17/12/2024

**अतिमहत्वाचे/कालमर्यादीत**

**प्रति,**
**गटशिक्षणाधिकारी,**
**पंचायत समिती सर्व**

**विषय:-जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी,कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी,केंद्रप्रमुख व उच्चश्रेणी मुख्याध्यापक यांच्या पदोन्नतीच्या अनुषंगाने अंतरिम संवर्ग निहाय सेवाजेष्ठता याद्या प्रसिध्द करणे बाबत.**

**संदर्भ:-१. शासन सामान्य प्रशासन विभाग,क्रंमाक:बीसीसी-२०१८/प्र.क्र३६६/१६-ब दिनांक ०७ मे २०२१**
**२.या कार्यालयाचे पत्र जाक्र/जिप/शिवि/आस्था-३/कावि/३४१४/२४ दिनांक १६/०७/२०२४**
**३.या कार्यालयाचे पत्र जाक्र/जिप/शिवि/आस्था-३/कावि/४४८६/२०२४ दिनांक २३/०९/२०२४**

उपरोक्त संदर्भिय क्रंमाक ०१ शासन निर्णयातील नमुद केल्याप्रमाणे विशेष अनुमती याचिका क्रं.२८३०६/२०१७ मधील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे सेवाजेष्ठतेनुसार भरणे बाबत तरतुदी विहीत केलेली आहे. त्यानुसार संदर्भ क्रं.०२ नुसार जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी,कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी,केंद्रप्रमुख व उच्च श्रेणी मुख्याध्यापक यांच्या पदोन्नतीच्या अनुषंगाने पदोन्नती कोटयातील पदे भरण्यासाठी पात्रता धारण करीत असलेल्या शिक्षकांची माहिती सादर करण्याबाबत कळविण्या आलेले होते.

त्यानुसार गटशिक्षणाधिकारी यांच्याकडुन प्राप्त झालेल्या माहिती नुसार सवंर्ग निहाय तात्पुरत्या सेवाजेष्ठता याद्या संदर्भिय क्रं०३ अन्वये प्रसिध्द करुन सदरील यादीवर आक्षेप मागविण्यात आलेले होते. तथापी गटशिक्षणाधिकारी यांनी पदोन्नतीच्या अनुषंगाने सादर केलेली माहितीमध्ये त्रुटी आढळून आल्यामुळे संवर्ग निहाय याद्या पडताळणी करुन फेरसादर करणे बाबत अवगत करण्यात आलेले होते.

त्याअनुषंगाने गटशिक्षणाधिकारी यांनी संवर्ग निहाय सेवाजेष्ठता याद्या पडताळणी करुन सादर केलेल्या आहेत. त्यानुसार शिक्षण विभाग (प्रा) संनियत्रीत कार्यरत जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी,कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख , माध्यमिक शिक्षक,उच्च श्रेणी मुख्याध्यापक, प्राथमिक शिक्षक व प्राथमिक पदवीधर यांच्या सवंर्गनिहाय याद्या याव्दारे प्रसिध्द करण्यात येत आहेत. सदर सेवा जेष्ठता याद्या सबंधीत कर्मचाऱ्यांच्या सुलभतेसाठी zpparbhani.gov.in वर प्रसिध्द करण्यात येत असून,आपल्यास्तवर तयार करण्यात आलेल्या शिक्षकांच्या व्हॉटस्प ग्रुपवर योग्य ती प्रसिध्दी देण्यात यावी. व पंचायत समितीस्तरावर योग्य त्या प्रसिध्दी देण्यात यावी. त्यानुसार गटशिक्षणाधिकारी यांनी सदरच्या यादीवर काही आक्षेप/हरकती असल्यास त्याबाबत लेखी अर्जासह पुरव्यानिशी दिनांक १७/१२/२०२४ ते २०/१२/२०२४ या दरम्यान आपल्यास्तरावर एक दिवसीय कॅम्प लावून आक्षेप प्राप्त करुन घ्यावे. प्राप्त झालेल्या आक्षेपांची पडताळणी करुन दिनांक- २३/१२/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता शिक्षण विभाग (प्रा) येथे समक्ष येऊन सादर करण्यात यावे. विहित मुदतीनंतर आलेल्या अक्षेपांचा विचार केला जाऊ नये.

**(मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने)**

**शिक्षणाधिकारी (प्रा)**
**जिल्हा परिषद परभणी**

**प्रतिलिपी**

१.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद परभणी यांना माहितीस्तव सविनय सादर.
२.मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा),जिल्हा परिषद परभणी यांना माहितीस्तव सादर.

स्वाक्षरित/-
**शिक्षणाधिकारी (प्रा)**
**जिल्हा परिषद परभणी**